महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.मासं/रवका/न.क्र.५६९/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट नं.जी-९,
प्रो.अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व),
मुंबई - ४०० ०५१.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २६४७५९९५
फॅक्स क्रमांक : ०२२ - २६५८०६४२


## प्रशासकीय परिपत्रक क्र. ४३९ दिनांक १६ / ११ / २०१२

विषय : म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना ०१ जुलै २०१२ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

वाचा : स.सा.आ.क्र.११७ (क) दिनांक ३१.३.१९८६

......

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या निर्णय **क्र.मभवा-१११२/प्र.क्र.१५/सेवा-९ दि.०९ एप्रिल २०१२** अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना दि.०१.०७.२०१२ पासून सुधारित वेतन संरचनेतील मुळ वेतनावरील (वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ६५ % वरून ७२ % केला आहे. तसेच **दि.०१.११.२०१२** पासून सदर महागाई भत्त्याची रक्कम रोखीने देण्यात यावी व **दि.०१.०७.२०१२ ते ३१.१०.२०१२** या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील असेही आदेश दिले आहेत.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना त्यांचे मुळ वेतनावर **६५ %** ऐवजी **७२ %** अशा सुधारित दराने दि. ०१.०७.२०१२ पासून महागाई भत्ता देण्याबाबत संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजुरी दिली आहे. तसेच सुधारित दरानुसार महागाई भत्त्याची रक्कम महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना माहे **नोव्हेंबर २०१२** पासूनच्या वेतनामध्ये समाविष्ट करुन देण्यात यावी.

४. त्याचप्रमाणे सुधारित दराने द्यावयाच्या **दि.०१.०७.२०१२ ते ३१.१०.२०१२** या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत शासन निर्णयानुसार स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

१६/११/१२

***( संदेश हाके )***
***मुख्य महाव्यवस्थापक (मासं)***

*D:\O&M\D.A-Adm.Circular*
*16/11/2012*